महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☏२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☏२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

**क्रमांक :** १४७७(२)/२०१९/शिफारस/१४-अ **बैठक क्रमांक :** PN005228 **दिनांक :** ०१/१०/२०२१

**प्रति ,**

**PATIL VAIBHAV SHANKAR (0030071902061900196)**

**विषय :- राज्य सेवा (मुख्य) परीक्षा-2019 नियुक्तीसाठी शिफारस करण्याबाबत.**

महोदय /महोदया,

उपरोक्त विषयासंदर्भात आपणांस असे कळविण्यात येते की, राज्य सेवा (मुख्य) परीक्षा-2019 च्या दिनांक 28 सप्टेंबर, 2021 रोजी जाहीर केलेल्या सुधारित अंतिम निकालातील आपला गुणवत्ताक्रम व आपण विविध पदांसाठी दिलेला पसंतीक्रम विचारात घेऊन आपली **Deputy Education Officer, Maharashtra Education Service, Group-B** या पदावर नियुक्तीकरिता अप्पर मुख्य सचिव (सेवा), महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग (18ब), मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-400032 यांच्याकडे शिफारस करण्यात आली आहे.

2. राज्य सेवा परीक्षेद्वारे नियुक्त होणाऱ्या गट-अ व गट-ब मधील अधिकाऱ्यांचा एकत्रित प्रशिक्षण कार्यक्रम शासनाकडून राबविण्यात येईल. याबाबतचा तपशील आपणांस शासनाकडून यथावकाश कळविण्यात येईल.

3. सदर परीक्षेच्या जाहिरातीत काही पदांकरीता विशिष्ट शैक्षणिक अर्हता व शारीरिक मानके विहित करण्यात आली आहेत. अशा पदावर शिफारस झाली असल्यास त्याबाबतची आपण पूर्तता करीत असल्यासच अशा उमेदवारांच्या नियुक्तीकरीता विचार करण्यात येईल. अन्यथा नियुक्ती प्राधिकरणाकडून नियुक्ती रद्द करण्यात येईल याची आपण नोंद घ्यावी.

4. आपण प्रस्तुत परीक्षेच्या अर्जात नमूद केलेल्या विविध दाव्यांच्या अनुषंगाने सदर परीक्षेच्या जाहिरातीतील विहीत केलेल्या तरतुदीनुसार आपली सर्वकष पात्रता मूळ प्रमाणपत्रांवरुन शासनाकडून / शासनाच्या सक्षम प्राधिकाऱ्यांकडून तपासण्याच्या अधीन राहून आपली शिफारस करण्यात आली आहे. तपासणीअंती आपण प्रस्तुत परीक्षेच्या अर्जात दिलेली माहिती खोटी अथवा चुकीची आढळून आल्यास अथवा अर्जातील दाव्यानुसार आपण आवश्यक त्या प्रमाणपत्राची पूर्तता न केल्यास / विहीत पात्रतेच्या अटीची पूर्तता करीत नसल्याचे आढळून आल्यास कोणत्याही टप्प्यावर आपली शिफारस / नियुक्ती रद्द करण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी.

5. प्रस्तुत परीक्षेचा निकाल समांतर आरक्षणाच्या, अनाथ आरक्षणाच्या व अन्य मुद्दयांसंदर्भात विविध मा. न्यायालयात / मा. न्यायाधिकरणात दाखल करण्यात आलेल्या न्यायिक प्रकरणातील अंतिम न्याय निर्णयाच्या अधीन राहून जाहीर करण्यात आला आहे.

6. आयोगाच्या www.mpsc.gov.in या संकेतस्थळावर असलेला साक्षांकन नमुना डाऊनलोड करुन आणि संपूर्ण भरुन तो अप्पर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग (18ब), मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-400032 यांच्याकडे तात्काळ परस्पर पाठवावा. साक्षांकन नमुन्यामधील अटक, शिक्षा, दंड व इतर कारवाई इत्यादीची माहिती संबंधित रकान्यात 'होय' किंवा 'नाही' या उत्तराने भरावी. अन्यथा साक्षांकन नमुना स्वीकारला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

7. नियुक्ती संबंधातील पुढील सर्व पत्रव्यवहार उपरोक्त प्राधिकाऱ्यांकडेच करण्यात यावा.

**आपला विश्वासू ,**

**(लि. र. भोसले)**
**अवर सचिव,**
**महाराष्ट्र लोकसवा आयोग,मुंबई**

458742 16000000000069705529540